# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १२० वा गुरूवार दि.२८ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## गणेश विसर्जनासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त

मुंबई : गणेश विसर्जनासाठी मुंबई पोलिसांची जय्यत तयारी झाली सुरु झाली आहे. (गुरुवारी) मुंबई पोलिसांचा तगडा बंदोबस्त असणार आहे. यासाठी तब्बल १९,००० पोलीस कर्मचारी रस्त्यावर तैनात असणार आहेत. मुंबईचे सहपोलीस आयुक्त सत्या नारायण यांनी ही माहिती दिली आहे. ते म्हणाले की, पोलिसांच्या वैद्यकीय रजा वगळता इतर सर्व सुट्या रद्द करण्यात आल्यात आहेत. गणेश विसर्जनाला कोणत्याही प्रकारे गालबोट लागू नये यासाठी पोलिसांकडून मोठा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. त्याशिवाय, मुंबईत होमगार्डस, विविध स्वयंसेवी संस्था, पोलीस मित्रांची मदतदेखील घेतली जाणार आहे. त्याचबरोबर जीवरक्षकांचाही सोय करण्यात आली आहे.

मुंबई पोलीस दलाकडून ८ अप्पर पोलीस आयुक्त, २५ पोलीस उपायुक्त, ४५ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह २८६६ पोलीस अधिकारी आणि १६,२५८ पोलीस शिपाई बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आलेले आहेत. त्यांच्या सोबत महत्वाच्या ठिकाणी



३५ एसआरपीएफ पलटन, क्यूआरटी पथक, दंगल नियंत्रण पथक, होमगार्डस् देखील बंदोबस्तासाठी असणार आहेत. मुंबईतील गिरगांव, दादर, जुहू, मार्वे, अक्सा या प्रमुख विसर्जन स्थळांसह ७३ नैसर्गिक ठिकाणांव्यतिरिक्त १६० हून अधिक कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्या प्रत्येक ठिकाणी कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीने कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

प्रत्येक विसर्जनाची ठिकाणे सीसीटीव्ही निगराणीखाली असून प्रमुख विसर्जनाच्या ठिकाणी ध्वनीक्षेपक यंत्रणेसह तात्पुरते नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. तसेच वाहतूक पोलीस विभागाकडून वाहतूकीचे योग्य नियमन करणेकरीता चोख उपाययोजना करण्यात आली आहे. त्याचबरोबर २९ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद सण साजरा करण्यात येणार असून त्या निमित्ताने मुंबई शहरात विविध ठिकाणी मिरवणुकांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

यंदाही मोठी गर्दी

लालबागच्या राजाच्या विसर्जनाला यंदाही मोठी गर्दी होणार असल्याचा अंदाज आहे. त्यासाठीदेखील मुंबई पोलिसांकडून लालबागच्या राजाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी विशेष बंदोबस्त असणार आहे. केवळ लालबाग-परळ भागात ३०० सीसीटीव्हींची सोय केली आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी सहा छेडछाडविरोधी पथक तैनात करण्यात आले आहेत. मोबाईल चोरांवर लक्ष ठेवण्यासाठी ६ विशेष पथके असणार आहेत.

## अवकाश क्षेत्रातील अपयश हे नैसर्गिक : इस्रो प्रमुख




बंगळुरू : ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशनच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) प्रमुख एस. सोमनाथ यांनी बुधवारी संबोधित केले. यावेळी त्यानी सांगितले की, अवकाश क्षेत्रातील अपयश हे नैसर्गिक आहे, परंतु अपयशासाठी अंतराळ संस्थेतील कोणालाही शिक्षा दिली जात नाही. त्यामुळे वैज्ञानिक निर्णय घेण्याच्या नवीन पद्धतींना प्रोत्साहन मिळते.

सोमनाथ म्हणाले की, अंतराळ क्षेत्रातबाबत एक व्यक्ती सर्वकाही समजू शकत नाही आणि म्हणूनच सामूहिक निर्णय घेतले जातात. सामूहिक निर्णय म्हणजे अपयशाची जबाबदारीही सामूहिक असते. म्हणजे ही जबाबदारी व्यवस्थापनाची आहे आणि त्यासाठी कोणीही जबाबदार नाही. म्हणून, लोक नवीन दृष्टिकोन स्वीकारण्यास किंवा निर्णय घेण्याचे धाडस करतात. अन्यथा प्रत्येकाला जोखीम घेणे टाळावेसे वाटेल. हे अगदी स्पष्ट आहे की, जेंव्हा काम केले जाते तेंव्हा अपयश हा प्रक्रियेचा नैसर्गिक भाग असतो आणि अपयशाची कारणे ओळखणे आणि आवश्यक त्या दुरुस्त्या करणे हा त्याचा दृष्टीकोन आहे.

अनेकदा अपयशाचा सामना

सोमनाथ म्हणाले की, त्यांना अनेकदा अपयशाचा सामना करावा लागला, परंतु त्यांच्या वरिष्ठांनी कधीही त्याबद्दल टीका केली नाही. आम्ही हे सुनिश्चित करतो की कोणत्याही एका व्यक्तीला अपयशासाठी शिक्षा होणार नाही, कारण कोणताही निर्णय एकट्याने घेतलेला नसतो तर हे निर्णय एकत्रितपणे घेतले जातात.

## हक्काच्या पाण्यासाठी संभाजीरावांच्या पाठीशी लातूर ग्रामीण ताकतीने उभा राहील-आ. कराड

लातूर - दुष्काळी जिल्हा म्हणून लातूरची ओळख देशात झाली असून हा कलंक पुसण्यासाठी हक्काचे पाणी शेतीला आणि उद्योगाला मिळाले पाहिजे त्याशिवाय गावाचा तालुक्याचा पर्याय आणि जिल्ह्याचा विकास होणार नाही जल-साक्षरता रॅलीचे प्रणेते संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेल्या पाणी प्रश्नाच्या लढ्यासाठी त्यांच्या पाठीशी लातूर ग्रामीण मतदारसंघ ताकतीने उभा राहील अशी ग्वाही भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील ठिकठिकाणच्या जलसाक्षरता कार्यक्रमात बोलताना दिली.



लातूरला हक्काचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेली जिल्हास्तरीय बाईक जलसाक्षरता रॅलीचा सोमवारी लातूर तालुक्यातील चिंचोलीराव, अंकोली पाटी, सावरगाव पाटी, टाकळी, ढाकणी, निवळी,गुंफावाडी, मुरुड, बोरगाव काळे, खंडाळा पाटी, हिसोरीपाटी, शिराळा चिंचोली (ब), ढोकी, काडगाव, भोईसमुद्रा या सर्व विविध गावचा दौरा झाला. प्रत्येक ठिकाणी मोठ्या उत्साहात फटाक्याची आतिषबाजी करून विविध वाजंत्रीच्या गजरात फुलांची उधळण करत रॅलीचे जोरदार स्वागत करण्यात आले मुरुडसह निवळी, चिंचोली बल्लाळनाथ, काडगाव, भुईसमुद्रा आदी ठिकाणी जाहीर कार्यक्रमातून जनतेशी संवाद करण्यात आला त्यावेळी बोलताना आ रमेशआप्पा कराड बोलत होते यावेळी भाजपाचे दिलीपराव देशमुख, संजय दोरवे, विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, हनुमंत बापू नागटिळक, बन्सी भिसे, वैभव सापसोड विजय काळे, सुरज शिंदे, साहेबराव मुळे, गोपाळ पाटील, गोविंद नरहरे, सुधाकर गवळी, चंद्रसेन लोंढे, अनंत कणसे, धनराज शिंदे, विश्वास कावळे, काशिनाथ ढगे, बालाजी दुटाळ, शंकर चव्हाण, हनुमंत शिंदे, सचिन सवई यांच्यासह त्या गावातील प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

वैभव संपन्न घराण्यातील संभाजीराव पाटील स्वतःसाठी अथवा स्वतःच्या स्वार्थासाठी नव्हे तर जनतेच्या हितासाठी हक्काच्या पाणीसाठी रस्त्यावर उतरले गावोगाव त्यांचे जल्लोषात स्वागत होत आहे सर्व स्तरातील जनता आशीर्वाद देत आहे असे सांगून यावेळी बोलताना आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, भौतिक विकासाबरोबरच शेतीला आणि उद्योगाला पाणी मिळाले पाहिजे तरच आपला तालुका आणि जिल्हा समृद्ध होईल वैभव मिळेल तेव्हा पाणी प्रश्नासाठी पक्ष भेद बाजूला ठेवून सर्वांनी या लढ्याला समर्थन दिले पाहिजे असे बोलून दाखविले.

समुद्रात वाहून जाणारे पाणी आपल्याला मिळाली पाहिजे यासाठी हा संघर्ष आहे गरज पडली तर मुंबईपर्यंत धडक मारू हक्काचे पाणी मिळवण्यासाठी शेवटपर्यंत संघर्ष करू असेही आमदार कराड यांनी बोलून दाखविले

यावेळी बोलताना आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, सरकारने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला आहे परंतु हे पाणी गोदावरी पात्रात आले तर त्याचा लातूर, बीड व धाराशिव जिल्ह्यांना फायदा होणार नाही. मांजरा व तेरणा खोऱ्यात हे पाणी येणे आवश्यक आहे. यासाठी आपण जनरेटा उभा उभारला पाहिजे आपल्या हक्काचे पाणी पदरात पाडून घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. पाण्यासाठी सर्वांनी एकत्रित येण्याची गरज आहे.

लातूर तालुक्यात ठीक ठिकाणी झालेल्या जल-साक्षरता सभेस शेकडो दुचाकीस्वारांसह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ठिकठिकाणच्या गणेश मंडळ, ग्रामपंचायत, सोसायटी, विविध संघटना, व्यापारी, युवक मंडळ, मित्र मंडळ, शेतकरी, शेतमजूर यांच्यासह नागरिकांनी पाठिंबा पत्र आ निलंगेकर यांच्याकडे सुपूर्द केली.

## आधार अद्ययावत कॅम्प संपन्न



मुरुड /महेंद्र आल्टे : संभाजी कॉलेज मुरुड येथे दिनांक २५/०९/२०२३ ते २७/०९/२०२३ या तीन दिवशी भूगोल विभागाच्या वतीने आधार कार्ड अद्ययावत कॅम्पचे आयोजन करण्यात आले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार सर्व विद्यार्थ्यांचे एबीसी आयडी काढणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत असणे गरजेचे आहे. आपले आधार कार्ड अद्ययावत करण्यासाठी विद्यार्थ्यांनी भूगोल विभागाकडे नोंदणी केलेली होती. अशा सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड सदरील कॅम्प मध्ये अद्ययावत करण्यात आले. या कॅम्पमध्ये एकूण ६० विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड अद्ययावत केले आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनंत पिडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कॅम्प यशस्वीपणे संपन्न झाला. आधार अद्ययावत करण्याचे काम मुरुड येथील महा-ई-सेवा केंद्राचे अविनाश सवई, मुरुड ग्रामपंचायत सदस्या सौ.श्रृती सवई यांनी पाहिले. सदरील कॅम्प यशस्वी करण्यासाठी भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.एच.एस. वाघमारे, प्रा. डॉ. एस.एन.उबाळे, प्रा. डॉ. जी.एल.जाधव, आयक्युएसीचे समन्वयक प्रा. एम. बी.गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

## चेहऱ्यावर हसू फुलवणारे चेहरे बनूया - डॉ. बी. एम. हिर्डेकर

कोल्हापूर / प्रतिनिधी :- समाजात अविवेकाचे वारे वाहत असताना आपण सामान्य माणसांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारे चेहरे बनूया, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंनिस चे जिल्हा अध्यक्ष डॉ बी एम हिर्डेकर यांनी केले. ते देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स आणि नाईट कॉलेज कोल्हापूर यांनी आयोजित केलेल्या विवेकी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत बीजभाषण करताना बोलत होते. डॉ हिर्डेकर पुढे म्हणाले, समाजात आई वडिलांचा सांभाळ, मुलांची काळजी घेणे, महिलांशी सन्मानाने वागणे असे सामान्य माणूस म्हणून अपेक्षित असणारे वर्तन करण्यासाठी सुद्धा कायदे करावे लागत आहेत. समाज म्हणून ही आपल्याला मागे नेणारी गोष्ट आहे. विवेकवाहिनीच्या माध्यमातून आपण समाजात सकारात्मक वातावरण बनवणारे नागरिक बनूया.

कार्यशाळेचे उद्घाटन करताना एज्युकेशन सोसायटी ऑफ कोल्हापूर चे सचिव डॉ विश्वनाथ मगदूम म्हणाले, एका बाजूला विज्ञानाने प्रगती केलेली असताना दुसरीकडे अंधश्रद्धा ही वाढत आहेत. अशा काळात तरुणाईने वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याची गरज आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉमर्स कॉलेज चे प्राचार्य डॉ व्ही. ए. पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून नाईट कॉलेज चे प्राचार्य डॉ. एस जे फराकटे उपस्थित होते. या कार्यशाळेत जिल्ह्यातील १७ कॉलेजचे १९० विद्यार्थी विद्यार्थिनी आणि २० प्राध्यापक सहभागी झाले होते. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी ' आम्ही प्रकाशबीजे ' हे रिंगण नाटक सादर केले. तर आम्ही वारस



विवेकाचे या सत्रात अक्षय कदम, सौरभ पोवार, तेजश्री पाटील, यश आंबोळे, योगेश कांबळे, शिवानी नागराळे यांनी विवेकवाहिनी म्हणजे काय, विवेकवाहिनीची गरज, विवेकवाहिनीचे संचालन, नेतृत्व विकास आणि विवेकवाहिनीने आम्हाला कसे घडवले याविषयी सविस्तर मांडणी केली. यानंतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि वर्तमान, प्रेम आणि आकर्षण, संविधान बांधिलकी, लिंगसमभाव आणि मानसिक आरोग्य या विषयांवर गटचर्चा केली. तसेच सहभागी प्राध्यापकांनी डॉ. हिर्डेकर यांच्या सोबत केलेल्या चर्चेत सध्याच्या अस्वस्थ वातावरणात महाविद्यालयांतून विवेकी पिढी घडवण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अरुण शिंदे यांनी केले. विवेकवाहिनी विभागाच्या जिल्हा कार्यवाह डॉ चैत्रा राजाज्ञा यांनी विवेकवाहिनी ची भूमिका मांडली. जिल्हा कार्याध्यक्ष रेश्मा खाडे यांनी आभार मानले तर मानसी बोळूरे आणि महेश ओलेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हरी आवळे, राहुल सुतार, प्रतिज्ञा कांबळे, हर्षल जाधव, स्वाती कृष्णात, राजवैभव शोभा रामचंद्र, तुषार चोपडे, आदित्य धनवडे आणि राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती यांनी प्रयत्न केले.

## संपादकीय....

# दुर्गा हो गं गौरी..

माहेर म्हणजे तिचे स्वत:चे घर. पण तिथे ती तीन दिवसांची पाहुणीच. तिथल्या काडीवर तिची सत्ता नसते. केले जातील ते लाडकोड करून घ्यायचे आणि आपला रस्ता सुधारायचा.. गणेशोत्सव वा नवरात्रासारख्या सणांतून स्त्रीशक्तीचे देव्हारे माजवले जातात.. पण स्त्रियांना अधिक सजग, समर्थ, सक्षम करण्याच्या बाबतीत प्रत्यक्ष व्यवहारात आपल्याकडे कसे वर्तन असते? गणपतीपाठोपाठ दोन दिवसांनी गौरीचे आगमन होते. गौर म्हणजे साक्षात माहेरवाशीण. ती आपल्यासोबत चैतन्य घेऊन येते. अगदी सोन्याच्या, मोत्याच्या पावलांनी येते. साडय़ा, दागदागिने, पुरणावरणाचा स्वयंपाक करून या लाडक्या लेकीचे सगळे लाडकोड पुरवले जातात. तिच्यामुळे घरदारातले वातावरण जिवंत, रसरशीत झालेले असते. म्हणजे ती सगळय़ांनाच हवी तर असते, पण तिसऱ्या दिवशी डोळय़ातले पाणी पुसत का होईना, तिची पाठवणी केली जाते. आणखी एखादा दिवस तिला राहायचे असेल तर काय, हा विचारही कुणाच्या मनात येत नाही. माहेर म्हणजे तिचे स्वत:चे घर. पण तिथे ती तीन दिवसांची पाहुणीच. तिथल्या काडीवर तिची सत्ता नसते. केले जातील ते लाडकोड करून घ्यायचे आणि आपला रस्ता सुधारायचा.. देवी म्हणून मखरात बसवली जात असली तरी गौर ही तशी सामान्य स्त्रियांचीच प्रतिनिधी. तिच्या वाटय़ाला येते ते त्यांच्याही वाटय़ाला येते. किंवा सामान्य स्त्रियांच्या वाटय़ाला येते, तेच तिच्याही वाटय़ाला येते, असे म्हणायला अगदी ताजा आधार दिला आहे, तो लोकसभेत आणि राज्यसभेत नुकत्याच संमत झालेल्या महिला आरक्षण विधेयकाने. भाजप सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन बोलवून गाजावाजा करत गेली कित्येक वर्षे रखडलेले हे विधेयक संमत करून घेतले खरे, पण त्यातून महिलांना नेमके काय मिळाले, या प्रश्नाचे उत्तर आज घडीला तरी संदिग्धच आहे. कोटय़ांतर्गत कोटय़ाच्या वादातून ते एकदा बार-गळले, या वेळी ते देऊ केले गेले आहे ते डीलिमिटेशन म्हणजेच मतदारसंघ पुनर्रचनेच्या अटीवर. मुळात प्रश्न हा आहे की महिलांना त्यांचा सत्तेमधला हक्काचा वाटा देण्याचा आणि मतदारसंघ पुनर्रचना यांचा एकमेकांशी संबंध काय? खरे तर काहीच नाही. महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणे म्हणजे ३३ टक्के पुरुषांच्या जागा कमी होणे. आज सत्तास्थानी म्हणजे खासदार असलेल्या आणि उद्या पुन्हा खासदारकी मिळवण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या प्रत्येकाला आपल्या सत्तेमध्ये कुणीच वाटेकरी नको असतो, हे उघडच आहे. त्यासाठी आधीच पुरुषापुरुषांमध्ये वाटमारी सुरू असताना स्त्रियांना त्या स्पर्धेत सहभागी करून घ्यायचे म्हणजे आपल्याच पायावर धोंडा पाडून घ्यायचा. ते कुणाला हवे असेल?

हेही वाचा व्यक्तिवेध : डॉ. स्वाती नायक

कुणालाच नाही. कारण भारतीय स्त्रियांनी वेगवेगळय़ा क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध केले असले तरी राजकारण हा त्यांचा प्रांत नाही, हे पुरुषांनीच ठरवले आहे. त्यामुळे या क्षेत्राचा चेहरामोहरा पुरुषप्रधानच राहिला आहे. निवडणुकांच्या संदर्भात कुरुक्षेत्र, रणांगण हे शब्द किंवा ५६ इंची छाती ही संकल्पना ही या पुरुषप्रधानतेचीच मिथके. महिला आणि बालकल्याण या खात्याकडे बघण्याची कुत्सित दृष्टी या मानसिकतेतूनच येते. त्यामुळे नेते मंडळींचे स्वागत- ओवाळणी एवढेच स्त्रियांचे राजकीय काम गृहीत धरले गेले.या क्षेत्रात निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचे प्रमाण दहा टक्केदेखील नाही, कारण एक तर राजकारण हा सत्तेचा खेळ. सत्ता मिळवायची, ती राबवायची आणि त्यातून आणखी सत्त-ावान होत जायचे ही महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्यांचे हे क्षेत्र. या पद्धतीच्या राजकीय सत्तेची थोडीदेखील अपेक्षा करणाऱ्या स्त्रीवर आपल्याकडे सरसकट अतिमहत्त्वाकांक्षी असा शिक्का मारला जा-तो आणि तिने अशी काही आकांक्षा बाळगणे कसे चुकीचे आहे, हेच तिला सतत सांगितले जाते. पूर्णपणे पुरुषांच्या अशा या क्षेत्रात वावरताना तिच्याकडून काही कमीजास्त झाले तरी तिच्या चारित्र्याचा हत्यारासारखा वापर करून तिचे पंख छाटले जातात. स्त्रियांनी स्त्रीभावाचे राजकारण करावे, पुरुषांसारखे राजकारण करू नये, हा मुद्दा योग्य असला तरी राजकारण करणारे पुरुष सगळय़ा गोष्टी करायला मोकळे आणि साधनशुचितेची अपेक्षा मात्र स्त्रियांकडूनच केली जाते. वेळेवर लग्न, वेळेवर मुले होणे या अपे-क्षेतून राजकारणासाठी द्यावा लागणारा वेळ पाहता एखादा अपवाद वगळता घरात राजकीय पार्श्वभूमी असलेल्या स्त्रियाच राजकारणात सक्रिय दिसतात. तेही त्यांच्या वडिलांची, पतीची किंवा मुलांची तशी अपेक्षा असते म्हणून. इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान झाल्या, सर्वोच्च स्थानी पोहोचल्या म्हणून स्त्रियांचा राजकीय सहभाग वध-ारला असे झाले नाही आणि आज द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती झाल्या म्हणूनही तो बदलेल असे नाही. जयललिता, मायावती, ममता बॅनर्जी यांच्यासारखे स्वकर्तृत्वातून मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोच-लेले अपवाद वगळता इतर स्त्रियांसाठी ती वाट बिकटच आहे. लोकसंख्येमधले स्त्रियांचे नैसर्गिक प्रमाण ५० टक्के म्हणजे पुरुषांच्या इतके, पण त्यांचा राजकारणातला सहभाग दहा टक्केदेखील नाही, ही परिस्थिती बदलण्यासाठी आरक्षण हाच उपाय असू शकतो. पण ते दिले तरी ३३ टक्के एवढय़ा संख्येने दिले गेले. लोकसभा आणि विधानसभेत लोकप्रतिनिधित्व करण्यासाठी ती क्षमता असलेल्या स्त्रियाच मिळणार नाहीत, या पातळीवर काम करण्यासाठीचा आवाकाच त्यांच्याकडे नाही, असे आक्षेप सुरुवातीला घेतले गेले. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या सरकारने ७३ व्या घटनादुरुस्तीअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर स्त्रियांना दिलेले आरक्षण हे या आक्षेपांना सणसणीत उत्तर ठरले. या आरक्षणामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या पातळीवर स्त्रियांचा ३३ टक्के या प्रमाणात सहभाग वाढला. सुरुवातीला आरक्षण लाग-ले म्हणून सरपंचाची बायको, मुलगी, सून असलेल्या स्त्रिया निवडणुकीला उभ्या राहात, निवडून येत. तळच्या स्तरातल्या अंगठा उठवणाऱ्या स्त्रियांना बळेबळे उभे केले जात असे आणि त्या निवडून येत. पण वेगवेगळय़ा संस्थांकडून, यंत्रणांकडून मिळालेल्या प्रशिक्षणामुळे, मिळालेल्या माहितीमुळे त्यांच्या कामात हळूहळू लक्षणीय सुधारणा होत गेली. 'पर्सनल इज पोलिटिकल' हे तत्त्व जणू या स्त्रियांनाच जास्त नीट समजले होते आणि त्यामुळे पुरुषांनी दुर्लक्ष केलेले पाणी, शाळा, दलित वस्त्यांमध्ये वीज हे प्रश्न या स्त्रियांनी प्राधान्याने हाताळ-ले. सत्ता कशासाठी राबवायची असते, या संदर्भात त्यांनी दाखवलेली शहाणीव खरोखरच विलक्षण होती. हजारो वर्षांच्या व्यवस्थेतून पुरुषांना जे सहज मिळाले आहे, ते मिळवण्यासाठी स्त्रियांना मात्र झगडावे लागते आहे. आम्ही तुम्हाला आरक्षण देतो आहोत, वर्षांनुवर्षे रखडलेला न्याय देतो आहोत, अशीच आजच्या 'देणाऱ्यां'चीही भूमिका आहे. पाच दिवसांच्या विशेष अधिवेशनाचा घाट जणू त्यासाठीच. हे देणेही 'कोल्हा आणि करकोचा'च्या गोष्टीसारखे. ते का, याचा ऊहापोह 'करकोचा आणि खीर' (२१ सप्टेंबर) या संपादकीयात आहेच. 'दिल्यासारखे दाखवायचे आणि प्रत्यक्षात द्यायचे तर नाहीच' याचे आणखी उदाहरण असे की, या ताज्या विधेयकात महिला आरक्षण रोटेशन म्हणजे चक्रानुक्रम पद्धतीने आहे

# कॅनडाऊ त्रुदॉऊ..

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले वाढलेले आंतरराष्ट्रीय वजन वापरावे आणि मागच्या दरवाजाने संपर्क साधून त्रुदॉ शांत कसे बसतील हे पाहावे. त्रुदॉ यांनी निज्जर हत्येसाठी जाहीरपणे भार-तास बोल लावू नयेत यासाठी आपणाकडून प्रयत्न होणे मुळात आवश्यक होते. आता या हत्येशी आपला संबंध नसल्याचे पटवून द्यावे हे बरे.. भारत आणि कॅनडा यांच्यात सध्या जे काही सुरू आहे त्यात बरीच गुंतागुंत आहे असे वाटत असले तरी तसे नाही. यात फक्त दोन मुद्दे महत्त्वाचे ठरतात. पहिला म्हणजे कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन त्रुदॉ म्हणतात त्या प्रमाणे खलिस्तानवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत खरोखरच भारताचा हात आहे किंवा काय.. याचे उत्तर काय असेल हे गृहीत धरणे अवघड. कारण असे काही आपण करतच नाही, असे म्हणणे अगदीच भाबडेपणाचे. लोकशाही देश एकमेकांचे मित्र असले तरी एकमेकांवर हेरगिरी करीत असतातच हे नाकारण्यात अर्थ नाही. म्हणजे अमेरिका आणि इंग्लंड हे एकमेकांचे घनिष्ठ सहकारी असले तरी त्यांच्यातही हेरगिरी होतच असते. तथापि गुप्त माहिती मिळवण्याचे असे प्रयत्न सुरू असले तरी त्याबाबत एक किमान पथ्य पाळले जाते. ते म्हणजे या विषयी कोणी काहीही वाच्यता करत नाही. तशी वाच्यता करावी लागेल असे प्रसंग हे देश टाळतात. आणि दुसरी खबरदारी आवर्जून घेतली जाते म्हणजे दुसऱ्या लोकशाही देशाच्या भूमीत स्वदेशहितास बाधा आणणाऱ्याच्या हत्येसारखा कायदाभंग केला जात नाही. अशी वेळ आलीच तर अशा प्रकारची कृत्ये ही तटस्थ भूमीत केली जातात. आपल्या मित्रदेशास अडचणीत आणू नये असाच प्रयत्न सर्व देशांचा असतो. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर निज्जर याची हत्या आपण करवली की नाही, याचे उत्तर अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यातही हा देश कॅनडा आहे, म्हणून तर अधिकच महत्त्वाचे.त्यास कारण म्हणजे 'पंचनेत्र (फाइव्ह आइज) करार'. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, ब्रिटन आणि अमेरिका या पाच देशांत हा करार आहे. त्यानुसार हे देश एकमेकांस गुप्तचर संदेशवहनाची संपूर्ण माहिती देतात आणि एका देशाच्या गुप्तचर यंत्रणेस हाती लागलेले काही धागेदोरे अन्य चौघांत वाटून घेतले जातात. कॅनडाचे पंतप्रधान त्रुदॉ यांनी त्या देशाच्या पार्लमेंटमध्ये भारताबाबत असे विधान केल्यानंतर अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि ब्रिटन हे कॅनडाची तळी उचलताना दिसतात ते यामुळे. याचा अप्रत्यक्ष अर्थ असा की कॅनडाच्या गुप्तचर यंत्रणांच्या हाती भारताच्या कथित सहभागाबद्दल जो काही पुरावा असेल तो त्या देशाने अन्य चार देशांस सादर केला असण्याची शक्यता आहे आणि यातील अमेरिका, ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया यांना त्यात काही तथ्य आढळले असणेही शक्य आहे. तसे असेल तर आपण केलेला गुन्हा गंभीर आहे, हे मान्य करावे लागेल. उत्तर प्रदेशात विकास दुबे वा अतिक अहमद वा तत्समांचे पोलीस एन्काऊंटर करणे वेगळे आणि आ-पला मित्रदेश असलेल्या लोकशाही देशात कथित दहशतवाद्याची हत्या करणे निराळे. तेव्हा त्रुदॉ म्हणतात तसे या नज्जरच्या हत्येशी भारतीय संबंध असणे आणि त्याहीपेक्षा त्याचा पुरावा आढळणे हे आपणासाठी निश्चितच गैरसोयीचे आहे. हे 'पंचनेत्र करारा'चा भाग नसलेल्या देशात घडले असते तर त्यामुळे इतकी अडचण झाली नसती. कॅनडा हा 'पंचनेत्र'चा भाग असल्याने अन्य चार देश त्यांस वाऱ्यावर सोडू शकत नाहीत. तसेच बाजारपेठेकडे लक्ष असल्याने भारताचीही निर्भर्त्सना करू शकत नाहीत. तेव्हा त्रुदॉ यांच्या जाहीर आरोपाच्या कृतीमुळे या चार देशांचीही अडचण झाली हे नाकारता येत नाही. कारण हे असले मुद्दे एकदा का जाहीर झाले की त्यावर कारवाई न करता ते सोडून देणे अशक्य. त्यामुळे भारताच्या कॅनडातील राजनैतिक अधिकाऱ्यांची हकालपट्टी त्या देशास करावी लागली आणि त्यापाठोपाठ जशास तसे न्यायाने आपणासही समकक्ष अधिकाऱ्यास कॅनडात परतण्याचा आदेश द्यावा लागला. आता हे प्रकरण आणखी वाढल्याचे दिसते. ते टाळण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे ही बाब चव्हाटय़ावर न येणे. तशी ती येऊ नये म्हणून आपण थेट पंतप्रधान मोदी यांच्याशीच यावर बोललो असे त्रुदॉ म्हणतात. त्याचा प्रतिवाद आपल्या पंतप्रधानांनी केलेला नाही. आपल्या वतीने परराष्ट्र खात्याने यावर प्रतिक्रिया दिली. त्रुदॉ म्हणतात तसे ते खरोखरच पंतप्रधान मोदी यांच्याशी बोलले असतील तर सदर चर्चा चार भिंतीच्या आत का राहू शकली नाही, हा खरा प्रश्न. त्रुदॉ यांनी निज्जर हत्येसाठी जाहीरप-णे भारतास बोल लावू नयेत यासाठी आपणाकडून काय प्रयत्न झाले? ते झाले नसतील तर आपला या हत्येशी काहीही संबंध नाही हे आपण कॅनडास पटवून देऊ शकतो का? याचे उत्तर होकारार्थी असल्यास पुरावा द्या असे आव्हान आपण कॅनडास का देत नाही? कारण कॅनडा वा आपण यात खरे कोण; खोटे कोण हे



सिद्ध करण्याचा हाच एक मार्ग आहे. तो आपण टाळण्याचे कारण नाही. उलट तो टाळल्यास आपल्याच मनात आणि कृतीत काही काळेबेरे आहे, असा संशय निर्माण होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय माध्यमांतून तसा तो व्यक्त करण्यास सुरुवात झाली असून 'द इकॉनॉमिस्ट'सारखे नेमस्त साप्ताहिक तर भारतावर टीकेचे आ-सूड ओढताना दिसते.या सर्वांस उत्तर देण्यास आपले देशांतर्गत डिजिटल देशप्रेमी अजिबात उपयोगाचे नाहीत. हे समाजमाध्यमी बिनडोकी जल्पक अहमहमिकेने आपलेच कसे बरोबरचे तुणतुणे कितीही मोठय़ांदा वाजवत राहिले तरी भारताबाहेर ते ऐकले जाणार नाही. उलट या निमित्ताने आंतरराष्ट्रीय माध्यमांत आपण मणिपुरादी प्रकरणे कशी हाताळली याचीच उजळणी होऊ लागलेली आहे. यातील काही समाजमाध्यमी आपली इस्रायलच्या 'मोसाद'शी तुलना करू पाहतात. ती हास्यास्पद आणि केविलवाणी दोन्ही ठरते. हास्यास्पद कारण आपण हेरगिरीच्या मुद्दय़ावर 'मोसाद'च्या कैक युगे मागे आहोत आणि केविलवाणी अशासाठी की जगात अत्यंत आघाडीवरील यंत्रणा म्हणून 'मोसाद'चा गौरव होत असला तरी त्यामुळे इस्रायलसमोरील आव्हान तसूभरानेही कमी झालेले नाही. उलट 'मोसाद'ने एक प्रतिस्पर्धी मारला तर त्यातून दहा नवे आकारास आले. तेव्हा हा काही मार्ग असू शकत नाही. तो आहे असे ज्यांस वाटते त्यांनी कुलभूषण जाधव यांस पाकिस्तानच्या तावडीतून आपण कधी सोडवणार याचे उत्तर द्यायला हवे. तसेच भारतातल्या नाजूक अर्थघोटाळय़ांत हवा असलेला कुख्यात हिरे व्यापारी मेहुल चोक्सी याच्या वेस्ट इंडिजमधील अँटिग्वा बेटावरून गतसाली झालेल्या अपहरणासाठी कोणास जबाबदार धरले गेले, याचाही विचार या निमित्ताने करण्यास हरकत नाही. तेव्हा जे झाले ते पुरे. आता प्रयत्न हवेत ते हे प्रकरण लवकरात लवकर कसे मिटेल यासाठी. हा दुसरा भाग. भारतीय गुप्तचर अधिकाऱ्याचा नामोल्लेख करून त्रुदॉ यांनी हे सारे चव्हाटय़ावर आणले; ही पहिली चूक. असे काही उघडय़ावर आले की सर्व संबंधितांस मर्दुमकीची भाषा करीत एकमेकांची कशी जिरवली हे दाखवण्याखेरीज पर्याय नसतो. त्यात पुन्हा अलीकडे उदयास आलेल्या डिजिटल देशभक्तांचा रेटा. अशा वातावरणात मुत्सद्देगिरी मागे पडते. म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले वाढलेले आंतरराष्ट्रीय वजन वापरावे आणि मागच्या दरवाजाने संपर्क साधून त्रुदॉ शांत कसे बसतील हे पाह-ावे. गरम हवेत राजनैतिकता पाळता येत नाही आणि ही उष्णता नसत्याच स्फोटकतेस जन्म देते. तसे काही होणार नाही, याची खबरदारी आपणास आवश्यक. या कॅनडाऊ त्रुदॉऊमुळे निज्जर हा 'हुतात्मा' ठरू नये हे पाहाणे अधिक महत्त्वाचे आहे.

# करकोचा आणि खीर!

लोकसंख्येत जवळपास ५० टक्के इतक्या संख्येने असलेल्या महिलांना ताजे विधेयक ३३ टक्के आरक्षण देऊ पाहते. आहे त्यांनाच पुन्हा काही द्यावे हा आरक्षणाचा हेतू कधीच नसतो. त्यामुळे महिलांसाठीच्या ३३ टक्क्यांत अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासांचे आरक्षणही 'पाळले' जाईल हे पाहावे लागेल.. सुमारे ३६ वर्षांपूर्वी पहिल्यांदा राजीव गांधी यांनी प्रस्तावित केलेले, नंतर नरसिंह राव यांनी ज्यासाठी आवश्यक घटनादुरुस्ती केली ते, देवेगौडा यांनी पंतप्रधानपदाच्या काळात जे प्रत्यक्ष सादर केले ते, इंदरकुमार गुजराल यांनी आपल्या अल्पकालीन सरकारच्या काळात ज्यासाठी प्रयत्न केले ते, पंतप्रधानपदी अटलबिहारी वाजपेयी असताना ममता बॅनर्जी आणि सुमित्रा महाजन यांनी ज्याचा आग्रह धरला होता ते, ज्याच्यासाठी वाजपेयी यांनी सर्वपक्षीय बैठका आयोजित केल्या ते, नंतर मनमोहन सिंग-सोनिया गांधी यांनी ज्यासाठी प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपचे सहकार्य मागितले ते, समाजवादी मुलायमसिंह यादव आणि 'भ्रष्ट' लालूप्रसाद यादव यांच्या बरोबरीने भाजपने ज्यास विरोध केला ते, भाजपच्या समाजमाध्यमी गणंगांनी ज्यास एके काळी हिणकस शब्दांत विरोध नोंदवला होता ते महिलांना आरक्षणाचा अधिकार देणारे विधेयक मणिपुरातील महिलांची अवहेलना, महिला कुस्तीगिरांची विटंबना, उनाव, हाथरस इत्यादी ठिकाणी स्त्रियांवरील अत्याचार प्रकरणांत सत्ताधाऱ्यांची पुरती शोभा झाल्यानंतर अखेर नरेंद्र मोदी सरकारने लोकसभेत सादर केले. याबद्दल सरकारचे अभिनंदन करावे तितके थोडे. जे सरकार 'यत्र नार्युस्तु पूज्यन्ते..' इत्यादी सुभाषितांची वरचेवर पखरण करत असते त्या सरकारने आगामी निवडणुकांच्या तोंडावर का असेना पण महिला आरक्षणाचे विधेयक मांडले यापेक्षा अधिक पुरोगामी बाब ती काय? अशा तऱ्हेने महिलांस सर्व प्रतिनिधिगृहांत ३३ टक्के इतके प्रतिनिधित्व 'लवकरच' मिळू ला-गेल. यातील लवकरच म्हणजे कधी या प्रश्नाचा ऊहापोह करण्याआधी महासत्ता होऊ पाहणारा भारत महिलांचा योग्य तो सन्मान करण्याच्या मुद्दय़ावर कोठे आहे, हे पाहाणे उद्बोधक ठरावे. कारण ज्या देशात महिलांस देवता, प्रकृती, माता इत्यादी पूजनीय विशेषणांनी मढवले जाते त्या भारतवर्षांत केंद्रीय प्रतिनिधिगृहात महिलांचे प्रतिनिधित्व १४-१५ टक्के इतकेही नाही. अर्थात हे सबका साथ सबका विकास म्हणत सर्वात मोठय़ा अल्पसंख्यांस सर्वात कमी, खरे तर नगण्य, प्रतिनिधित्व देण्यासारखेच. त्यामुळे महिला गौरवगाथांची पारायणे सातत्याने केली जातात त्या देशात महिलांना सत्ताकारण, राजकारण यांत सर्वात कमी प्रतिनिधित्व आहे, हे आश्चर्य नाही. पण आश्चर्य हे की अशी काही सुवचने, सुविचार नसतानाही दक्षिण आफ्रिकेसारख्या 'मागास' देशातील प्रतिनिधिगृहांत महिलांचे प्रमाण ४५ टक्के आहे. अत्यंत भोगवादी वगैरे अशा ब्राझील देशात ते १८ टक्के आहे आणि आपला शेजारी चीनमध्ये २७ टक्के महिला प्रतिनिधिगृहात आहेत. हे आ-पली ज्यांच्याशी स्पर्धा आहे त्या ब्राझील, चीन, दक्षिण आफ्रिका इत्यादी देशांबाबतचे वास्तव. अमेरिका, इंग्लंड आदी प्रगत देशांत ते २५-३० टक्क्यांच्या आसपास आहे यात काही आश्चर्य नाही. आपल्याकडे राजकीय पक्षांकडून दिल्या जाणाऱ्या उमेदवारांत मुदलात महिलांचे प्रमाण ७-८ टक्के इतकेच असते. तेव्हा आडातच जे नाही ते संसदेच्या पोहऱ्यात कसे येणार हा प्रश्न. पण त्याच वेळी तमिळनाडू, आंध्र प्रदेश, आसाम, बिहार आदी राज्यांत स्थानिक पंचायतींमध्ये महिलांची संख्या पुरुषांच्या बरोबरीने आहे हे विशेष. यापैकी अनेक राज्यांत महिलांसाठी ५० टक्के आरक्षण आहे. म्हणजे कनिष्ठ पातळीव-रील निर्णयप्रक्रियेत स्थान दिल्या जाणाऱ्या महिलांचे प्रमाण सत्ता-अधिकार वर वर चढत गेले की कमी कमी होत जाते, असे दिसते. या वास्तवात नव्या आरक्षणामुळे बदल होऊ शकेल. लोकसंख्येत जवळपास ५० टक्के इतक्या संख्येने असलेल्या महिलांना ताजे विधेयक ३३ टक्के आरक्षण देऊ पाहते. कधीपासून हा यातील कळीचा मुद्दा. सरकारच्या अन्य अनेक तत्पर कल्याणकारी योजनांप्रमाणे हे आरक्षण लगेच लागू होणार नाही. याच सरकारने वास्तविक विशेष अध्यादेशाद्वारे घटनेत अनुस्यूत नसतानाही आर्थिक मागासांसाठी १० टक्के आरक्षण तातडीने लागू करण्याचा निर्णय घेऊन दाखवलेला आहे. त्यास गेल्या सार्वत्रिक निवडणुकांची पार्श्वभूमी होती. महिला आरक्षणास आगामी निवडणुकांची पार्श्वभूमी आहे. पण तरीही या मुद्दय़ावरही महिलांस दिली जाणारी वागणूक दुय्यम नाही, असे म्हणता येणार नाही. आर्थिक मागासांस दिल्या गेलेल्या आरक्षणाप्रमाणे महिला आर-क्षणही लवकरात लवकर अमलात आणण्याचा मार्ग सरकारने पत्करलेला नाही. उलट या आरक्षणासाठी निवडलेला मार्ग अधिकाधिक विलंबकारीच आहे. उदाहरणार्थ सरकार म्हणते आधी जनगणना केली जाणार, त्यानंतर मग लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना केली जाणार आणि मग त्यानंतर हे आरक्षण अमलात येणार. वास्तविक नियमाप्रमाणे २०२१ साली जनगणना सुरू होणे अपेक्षित होते. पण त्या वर्षी करोनाचे कारण पुढे करीत जनगणना टाळली गेली. आता करोना अनेकांच्या विस्मरणात जाईल इतका काळ लोटला असतानाही जनगणना हाती घेतली जाईल याची कोणतीही चिन्हे नाहीत. आता तर २०२४ सालातील निवडणुका होईपर्यंत जनगण-नेतील 'ज'देखील काढला जाणार नाही, अशी स्थिती दिसते. त्यानंतर २०२६ साली लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्चनेचा प्रदीर्घ काळ चालणारा कार्यक्रम हाती घेतला जाईल. ही प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असते. ती वेळेत पूर्ण करण्याचा आ-पला इतिहास नाही. ती समजा वेळेत झाली तरी नंतर न्यायालयीन आव्हान इत्यादी दिरंगाईकारक मुद्दे राहतातच. तेव्हा हे सगळे झाल्यावर महिला आरक्षण प्रत्यक्षात येऊ शकेल. तरीही 'शकेल' असा शब्दप्रयोग करावा लागतो याचे कारण अनुसूचित जाती/जमाती आदींच्या आरक्षणाचे काय करणार हा प्रश्न. सध्याच बिहारसारख्या



जातीय समीकरणांसाठी अत्यंत नाजूक राज्यात सत्ताकारणाचा भाग म्हणून 'ओबीसी' जनगणना सुरू झालेली आहे. अन्यत्र अशाच मागण्या पुढे येऊ लागलेल्या आहेत आणि जसजशा निवडणुका जवळ येतील तशी या विषयावरील मोर्चेबांधणी अधिकाधिक आक्रमक होऊ लागेल हे निश्चित. याचा सरळ अर्थ असा की यामुळे आरक्षणांतर्गत आरक्षण हा मुद्दा पुढे येईल. म्हणजे महिलांसाठी केवळ ३३ टक्के आरक्षण इतकीच तरतूद करून स्वस्थ राहता येणार नाही. या ३३ टक्क्यांत सर्व जाती/जमाती आदींचे आरक्षणही 'पाळले' जाईल हे पाहावे लागेल. हे असे काही न करता केवळ ३३ टक्के महिला आरक्षण अमलात आल्यास त्याचा (गैर)फायदा राजकीय प्रस्थापितांच्या घरांतील वा उच्चवर्णीयांतील महिलांनाच मिळेल हे उघड आहे. आहे त्यांनाच पुन्हा काही द्यावे हा आरक्षणाचा हेतू कधीच नसतो. ज्यांस नाही ते देऊन आहे त्यांच्या समान पातळीवर आणणे हा आरक्षणा-चा विचार. त्यामुळे उच्चवर्णीयांतील महिलांनाच फक्त आरक्षणाचा लाभ होणे सामाजिक तसेच राजकीयदृष्टय़ाही अयोग्य ठरेल. म्हणजे ते तसे होऊ नये यासाठी प्रयत्न करणे आले. परिणामी आरक्षण प्रत्यक्ष अमलात येणे अधिकच लांबणीवर जाईल, हे निश्चित. त्यामुळे महिलांच्या ताटात आरक्षण तर पडले आहे; पण फक्त कागदावर. त्याचे प्रत्यक्ष सेवन करण्यास प्रदीर्घ प्रतीक्षा करावी लागणार. हे म्हणजे इसापनीतीतील कोल्हा आणि करकोचा यांच्या कथेप्रमाणे झाले म्हणायचे. करकोच्यास सन्मानाने भोजनास बोलावून त्यास सपाट ताटलीत खीर वाढण्याचे 'चातुर्य' कोल्हा दाखवतो. सुग्रास खिरीचे भोजन समोर आहे; पण ते खाता येत नाही, अशी करकोच्याची अवस्था होते. साधारण दहा वर्षांनी जे प्रत्यक्षात येऊ शकेल असे आरक्षण धोरण आज सादर करून महिलांची अवस्था इसापच्या करकोच्याप्रमाणे होण्याचा धोका संभवतो. तो कसा टळणार आणि टाळणार?

# भंगती शहरे, दुभंगता विकास!

केवळ रोषणाई म्हणजे शहर सौंदर्यीकरण, घोषणा म्हणजेच वास्तव आणि अस्मितावाद म्हणजेच राजकारण– अशा अवस्थेत नगर व्यवस्थांची उसवती वीण लक्षातही घेण्यास कोणी तयार नाही.. मेट्रोची गरज आहेच, पण त्याहून गरज आहे ती शहर नियोजनाची. दुचाकींचा खप गोठून आलिशान मोटारींची मागणी वाढते, यामागचे अर्थवास्तव समजून घेण्याची आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्यांना केंद्रस्थानी मानण्याची..गेले दोन दिवस 'लोकसत्ता'ने गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाऊ इच्छिणाऱ्यांची ससेहोलपट चव्हाटय़ावर मांडली. तासाला १२०० इतक्या प्रचंड गतीने दुथडी भरून वाहणाऱ्या बसगाडय़ा, रेल्वेच्या बेफिकिरीने स्थानकांस आलेले निर्वासित छावण्यांचे स्वरूप, सागरी मार्ग उपलब्ध नाही आणि विमानांची सोय नाही. कोठेही न जाता शहरांत राहू इच्छिणाऱ्यांच्या हालअपेष्टा तर कुत्राही खाण्यास तयार नाही, खड्डेयुक्त मार्गांनी शहरांतर्गत वाहतुकीची पार उडालेली दैना, 'मेट्रो'च्या स्वप्नांचे मृगजळ आणि देशातील सगळय़ात गर्दीची 'मेट्रो' मार्गिकाही नुकसानीत निघालेली, (रविवारच्या अंकात गावोगावच्या मेट्रोचे गंभीर आर्थिक वास्तव पाहावयास मिळते), त्यात एखादा सण आला तर पोटात गोळा यावा अशी नागरी स्थिती. पुण्यात हवेतून उडणाऱ्या बसगाडय़ा येतील तेव्हा येवोत, पण तूर्तास जमिनीवरून मार्गक्रमण करायचे तरी कसे या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात हैराण झालेले रहिवासी. नाशकाकडे जाणाऱ्या कथित महामार्गाची तुलना तर रवांडा वा तत्सम देशांतील परिस्थितीशी व्हावी. औरंगाबादेत मंत्रिमंडळ बैठकीसाठी भले रंगरंगोटी झाली असेल, पण त्यामुळे नागरी जीवनातील बकालपणा काही दूर होत नाही. नागपुरातील काही भागांत नियोजनाच्या खुणा दिसतात खऱ्या; पण तो अपवाद! आणि या सगळय़ाच्या वर अमृतकाल आणि 'जी२०'च्या निमित्ताने करण्यात आलेली रोषणाई तर देहविक्रय करावा लागणाऱ्या अभागींच्या वस्तीची आठवण करून देईल अशी बटबटीत. हे आपल्या नागर जीवनाचे आजचे वास्तव. ते पक्षनिरपेक्ष नजरेतून पाहण्याइतका प्रामाणिकपणा आपल्याकडे शिल्लक आहे काय हा प्रश्न. त्याचे उत्तर शोधण्यात कोणालाही रस नाही. इतकेच नव्हे तर हे प्रश्न उपस्थित जरी करण्याचा प्रयत्न कोणी केला तरी पक्षीय अभिनिवेशाबरहुकूम प्रतिक्रिया उमटणार. सत्ताधारी समर्थक विचारणार 'तुम्हांस हे आताच बरे दिसते' आणि विरोधींचे पाठीराखे यांस सत्ताधीश कसे जबाबदार हे अहमहमिकेने सांगणार. वास्तविक हे जमिनीसत्य आहे तसे मांडण्याचे किमान कर्तव्य माध्यमे पार पाडू शकतात. पण त्यांस राजकीय रंजकतेतच अधिक रस. राजकारण्यांच्या वगनाटय़ांतील नाचे म्हणजे आजचे बहुतांश माध्यमकर्मी. त्यातील अनेकांस नागरिकांच्या समस्यांस हात घालण्यात अजिबात रस नाही. बरे नागरिकांस तरी तो आहे असे म्हणावे तर तशीही स्थिती नाही. धर्म/जात आदींच्या अफूच्या गोळय़ा चघळत या वर्गाची ब्रह्मानंदी टाळी लागलेली. हाताला काम नसेल; डोक्यावरचे छप्पर गळत असेल; पण जगण्यातील दारिद्रय़ाचे भगदाड अदृश्य आणि भ्रामक अस्मितांनी भरून येते या खुळचट भ्रमात बहुतांश वर्ग मश्गूल. आणि यांतील उच्चवर्णीय तर इतके चतुर की घोषणा म्हणजेच वास्तव असे ते स्वत: तर मानतातच आणि इतरांच्याही गळय़ात हा फसवा युक्तिवाद मारण्याचा प्रयत्न करतात. शहरांपासून दूर खेडय़ांत जावे तर तेथील वास्तवही असेच दुभंगलेले. आज महाराष्ट्राच्या अनेक प्रांतांत दुष्काळ नाही; पण अवर्षणसदृश स्थिती आहे. पण शहरवासीय या अवर्षणासही राजकीय नजरेतूनच मोजणार. म्हणजे शहरात चार सरी आल्या की हा चतुर वर्ग अवर्षणाचा उल्लेख करणाऱ्यांस खोटारडे ठरवण्याचा प्रयत्न करणार आणि अशांचे प्रतिस्पर्धी परिस्थिती आहे त्यापेक्षा किती तरी अधिक गंभीर असल्याचे सांगणार. हे सगळे आपणास कोठे घेऊन जाईल? हा प्रश्न पुन:पुन्हा पडतो याचे कारण आपली शहरे ही दिवसेंदिवस अधिकाधिक कफल्लक होऊ लागलेली आहेत. त्यांस उत्पन्नाचे साधन नाही. जे आहे त्यातून पोट भरेल अशी स्थिती नाही. वस्तू व सेवा कराने शहरांचेच काय पण राज्यांचेही उत्पन्नाधिकार काढून केंद्राकडे वर्ग केले आहेत आणि स्वत:हून या सर्वांस वाटावे इतकी केंद्राची अद्याप मिळकत नाही. गेले काही महिने वस्तू–सेवा कराच्या उत्पन्नात वाढ होत आहे हे खरे. पण त्याचा संबंध वाढत्या महागाईशी आहे. कारण वस्तू–सेवा कर हा अप्रत्यक्ष कर. गरीब असो वा श्रीमंत. त्याने कोणतीही वस्तू खरेदी केली की त्यावर हा कर द्यावा लागतोच लागतो आणि या वस्तूंच्या किमती वाढल्या की या कराचे उत्पन्नही वाढते. आर्थिकदृष्टय़ा चांगल्या व्यवस्थेचा भर अप्रत्यक्षपेक्षा प्रत्यक्ष करावर अधिक असतो. हे समजून घेण्याइतक्या आर्थिक शहाणपणाची तशी वानवा असल्याने विचारांध वर्ग वाढत्या वस्तू–सेवा कर उत्पन्नाचे आकडे पाहून संतुष्टीचा ढेकर देतो. अशा परिस्थितीत नगर व्यवस्थांची उसवती वीण लक्षातही घेण्यास कोणी तयार नाही. सगळय़ाच महानगर पालिका काही ठाणे शहरासारख्या भाग्यवान नसतात. हे मुख्यमंत्र्यांचे शहर. त्यामुळे या शहराच्या आर्थिक गरजा राज्य सरकारच्या तिजोरीतून बिनदिक्कत पुरवल्या जात असून हजारो कोटींचा निधी या शहराकडे वर्ग होताना दिसतो. नागपूर आणि अर्थातच बारामती यांच्याबाबतही हे सत्य काही प्रमाणात खरे. पण अन्यांनी करायचे काय? आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना अशी त्यांची स्थिती! परिणामी आपल्या शहरांची स्पर्धा आहे ती एकाच गोष्टीबाबत. ती म्हणजे वास्तवामागील आभास दाखवून देते. देशातील शहर वाहतुकीच्या समस्येवर हमखास उपाय म्हणून मेट्रोकडे बोट दाखवले जाते. तथापि वाईट नियोजन आणि त्याहूनही वाईट अंमलबजावणी यामुळे एकही मेट्रो नफा सोडा; पण उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ घालण्याइतकी सक्षम नाही. या मेट्रोमुळे रस्त्यावरील गर्दी कमी होईल असा एक दावा केला जातो. वास्तवाची जाण नसलेलेच तो करू धजतात. सर्वात गर्दीच्या अंधेरी–घाटकोपर मेट्रो मार्गाखालील रस्त्यावरील कोंडी पाहिल्यास त्याचा फोलपणा लक्षात यावा. याचा अर्थ मेट्रोची गरज नाही, असा नाही. ती आहेच. पण त्याच



बकालपणा. हे अधिक बकाल की ते इतकाच काय तो फरक. या वास्तवास पुन्हा एक वर्गीय झालर आहे. जमिनीवरील कटू वास्तवाशी काहीही संबंध नसलेला एक धनिक वर्ग आज प्रत्येक शहरात दिसून येतो. त्यांचे ना आसमंताशी काही घेणे असते ना परिसरास काही देणे. या वर्गाच्या उत्पन्नात काहीही झाले तरी घट होत नाही. उलट ते सतत वाढतेच असते. देशात दुचाकींची विक्री घटणे/ स्तब्ध होणे आणि त्याच वेळी आलिशान मोटारींच्या विक्रीत लक्षणीय वाढ होणे हे याचे महत्त्वाचे निदर्शक. सर्व काही शासकीय नियोजन होत असते ते या वर्गास डोळय़ासमोर ठेवून. या वर्गाची क्रयशक्तीही अधिक. उत्पन्नात घट नसल्यामुळे या वर्गाचे शॉपिंगोत्सव बारमाही सुरू असतात आणि मॉल–वर्गीय ग्राहक अबाधित असल्याने सर्व काही सुरळीत असल्याचे चित्र निर्माण होते.त्याच वेळी शहरांतील फाटक्या आणि गळक्या सार्वजनिक वाहतुकीतील गर्दी या जोडीला शहर नियोजनाची अधिक गरज आहे. त्याअभावी शहरांचे अव्याहत फुगणे सुरूच असून त्यामुळे मेट्रोसारख्या सेवा कितीही केल्या तरी त्यांचे अपुरेपण कायम राहणार आहे. आपल्याकडे खरी वानवा आहे ती या नियोजनाची. 'स्मार्ट सिटी'सारख्या केवळ घोषणांवर जोपर्यंत आपले पोट भरणे सुरू आहे तोपर्यंत या नियोजनाची गरज आपणास वाटणार नाही. या न वाटण्याचा दुष्परिणाम म्हणजे केवळ रोषणाई म्हणजे शहर सौंदर्यीकरण असे मानण्याचा पडलेला प्रघात. या आपल्या भंगत्या शहरांस कंत्राटदार–केंद्री विकास प्रारूपाचा टेकू किती काळ पुरणार? आपल्या शहरांतील मार्ग, महामार्गावर जे सध्या सुरू आहे ते हा विकासाचा दुभंग दाखवते. तो आपणास पाहावयाचाच नसेल तर आपल्यासारखे आनंदी आपणच!

# सव्यंग समानता!

केरळने समान नागरी कायद्याला विरोध केला, तर चालत नाही, पण मग नागालँड, मिझोराम या रालोआतील राज्यांचा विरोध कसा चालतो? भारतासारख्या अठरापगड जाती/धर्म/जमाती असलेल्या देशात एक देश–एक भाषा–एक धर्म–एक विवाहपद्धती (आणि मग एक निवडणूक–एक पक्ष इत्यादी) यांचा आग्रह धरणे कितपत शहाणपणाचे? कोणत्याही कायद्याची परिणामकारकता तो बनवताना सर्व पळवाटा किती प्रमाणात बुजवल्या जातात यावर असते. जितक्या कमी वा शून्य पळवाटा; तितका तो कायदा उत्तम असतो आणि अशा कायद्याची अंमलबजावणीही उत्कृष्ट होऊ शकते. याच्या जोडीला अशा चांगल्या कायद्याच्या परिणामकारकतेबाबत एक खबरदारी बाळगावी लागते. ती म्हणजे कायद्याच्या अंमलबजावणीतून कोणाचाही अपवाद असणार नाही. कायद्याच्या अंमलबजावणीतून कोणाचाही अपवाद केला जाणार नाही; ही अत्यंत आदर्श अवस्था. ती नसेल तर काय होते आणि कायद्याची परिणामकारकता कशी विकलांग होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे वस्तू–सेवा कायदा. 'जीएसटी'च्या अंमलबजावणीत पहिल्या दिवसापासून अनेक अपवाद दिले गेले. म्हणजे वस्तू–सेवा कायद्याचा अंमल सुरू होऊन इतका काळ लोटला तरी अद्याप पेट्रोल–डिझेल आणि मद्य यांचा अंतर्भाव या कायद्यात करण्यात आलेला नाही. इंधनासारखा पायाभूत घटक जेव्हा या कायद्याच्या कक्षेपासून दूर ठेवला जातो तेव्हा त्याचा परिणाम प्रत्येक घटकावर होतो. केंद्र सरकार म्हणते इंधनाचा समावेश वस्तू–सेवा करात करण्यास राज्य सरकारांचा विरोध आहे. राज्य सरकारांचे म्हणणे आमच्या महसूल नुकसानीची भरपाई कशी करणार ते आधी सांगा; आणि मगच इंधन या कराच्या अखत्यारीत आणा. ही नुकसानभरपाई कशी करायची याचे उत्तर केंद्राकडे नाही. ते कसे शोधायचे याचा विचार कायदा जन्मास घालण्यापूर्वी करायचा असतो. तो केलेला नाही. परिणामी वस्तू–सेवा कायदा जन्माला येतानाच महत्त्वाचे अपंगत्व घेऊन आला. नेमका हाच धोका आता ज्याचा गवगवा करणे सरकारला आवडते त्या 'समान नागरी कायद्या'बाबत संभावतो. त्याची दखल घेणे आणि त्यावर आताच विचार करणे अगत्याचे.

याचे कारण आणखी एका राज्याने समान नागरी कायद्यातून स्वत:स वेगळे ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. ही घटना अत्यंत दखलपात्र ठरते याचे कारण या राज्यातील सत्ताधाऱ्यांत भाजपचाच समावेश आहे. म्हणजे केंद्रात सत्ताधारी भाजप 'समान नागरी कायद्या'चे गोडवे गाणार, त्याची अपरिहार्यता मिळेल तेव्हा अधोरेखित करणार, या पक्षाचे समाजमाध्यमी भाट या कायद्यातील त्रुटी दाखवणाऱ्यास राष्ट्रद्रोही इत्यादी ठरवणार आणि त्याच वेळी त्याच पक्षाचे सरकार आम्हास हा कायदा नको, असे म्हणणार, असा हा दुटप्पी खेळ. या कायद्यास विरोध करणारे नवे राज्य आहे ते नागालँड. त्या राज्याचे मुख्यमंत्री नेईफेऊ रिओ यांनी याबाबत राज्याच्या निर्धाराची घोषणा केली. त्या राज्याच्या विधानसभेतच याबाबतचा ठराव मंजूर केला गेला आणि त्या ठरावास सर्वच पक्षांनी पाठिंबा दिला. या 'सर्व' पक्षात केंद्रातील सत्ताधारी भाजपदेखील आहे आणि रिओ यांची 'नॅशनॅलिस्ट डेमॉक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी' ही केंद्रातील 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'ची सदस्य आहे. ''समान नागरी कायदा विवाह प्रथा, घटस्फोट, विवाहितांच्या अपत्यांचे संगोपन इत्यादी मुद्दय़ांवर समान, एकच एक नियम करू इच्छिते. तसे झाल्यास नागा संस्कृतीच्या प्रथा, परंपरांस तडा जाण्याचा धोका आहे

# लातूरच्या पाण्यासाठी राजकारण विरहित एकत्रित प्रयत्न करू - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर

लातूर/प्रतिनिधी:
लातूरचा दुष्काळ आणि पाणीटंचाई ही भौगोलिक स्थितीमुळे उद्भवलेली आहे. लातूरकरांसाठी पाणी हा जीवनमरणाचा प्रश्न आहे.ही समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज असून त्यात सर्वपक्षीयांनी मतभेद विसरून सहभागी होणे गरजेचे आहे. इतर कोणी नेतृत्व करणार असेल तर आपण त्यांच्या मागे उभे राहण्यास तयार आहोत.पाणी प्रश्नासाठी एकत्रित यावे लागेल,असे आवाहन आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.





गणेश चतुर्थीच्या दिवशी निलंगा येथून सुरू झालेल्या जलसाक्षरता अभियानाचा मंगळवारी (दि.२६)रात्री लातूरच्या हनुमान चौकात समारोप झाला.याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ.निलंगेकर बोलत होते. व्यासपीठावर शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष ड.बळवंत जाधव,भाजपाचे प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर,जिपचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे,भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,औशाचे माजी नगराध्यक्ष अफसर शेख,किरण उटगे,भाजपा प्रदेश प्रवक्त्या प्रेरणा होनराव,शैलेश गोजमगुंडे, शिवानंद हेंगणे,अजित पाटील कव्हेकर,ड. गणेश गोमसाळे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की, पाण्याअभावी मराठवाडा आणि खास करून लातूरचा विकास खुंटलेला आहे.पाणी नसल्यामुळे या भागात उद्योग येत नाहीत. आता सरकारने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला आहे परंतु हे पाणी गोदावरी पात्रात आले तर त्याचा लातूर, बीड व धाराशिव जिल्ह्यांना फायदा होणार नाही.त्यामुळे मांजरा व तेरणा खोऱ्यात हे पाणी येणे आवश्यक आहे. यासाठी आपण जनरेटा उभारला पाहिजे,असे ते म्हणाले.

यापूर्वीही मराठवाड्याला राजकीय नेतृत्व मिळाले होते परंतु खुर्ची टिकविण्यासाठी त्यांना इतरांसमोर झुकावे लागले. पण आम्ही झुकणारे नाही. मराठवाड्याच्या हक्काचे पाणी पदरात पाडून घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही,असे निलंगेकर म्हणाले.

पश्चिम महाराष्ट्रातील नेते विकासासाठी मतभेद विसरून एकत्रित येतात. आपणही पाण्यासाठी एकत्रित येण्याची गरज आहे.इतर कोणी यासाठी पुढे येत असेल तर मी त्यांच्या मागे उभे राहण्यास तयार आहे.परंतु पाणी प्रश्नावर सोबत येणार नसाल तर तुम्हालाही बाजूला करून हा प्रश्न सोडवून घेऊ,असे ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना लातूरच्या पाणी प्रश्नाबाबत त्यांच्याशी चर्चा झाली होती.परंतु काही नतदृष्ट अधिकाऱ्यांनी ही योजना फायद्याची नसल्याचा शेरा फाईलवर मारला.परंतु पाणी हा नफा–तोट्याचा विषय नाही.कितीही पैसे लागले तरी लातूरसाठी पाणी उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला दिले आहे. याबाबतचा संपूर्ण तांत्रिक अभ्यास आपण केलेला असून ही योजना नेतृत्वाला पटवून देऊ,असे देखील ते म्हणाले.

आ.निलंगेकर यांनी सांगितले की,लातूर ही गुणवंतांची खाण आहे. राज्य व देशातील विद्यार्थी शिक्षणासाठी येथे येतात. त्यामुळे आयआयटी व एम्ससह केंद्रीय विद्यापीठ लातूर येथे होणे आवश्यक आहे.या संदर्भातही आपण प्रयत्न करत असून लातूरला केंद्रीय विद्यापीठ मिळवून घेऊच,असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना ड. बळवंत जाधव यांनी पाणी प्रश्नावर आपण कायमच आ.संभाजीराव पाटील यांच्यासोबत असल्याचे सांगितले.शिंदे–फडणवीस यांचे सरकार लातूरचा पाणी प्रश्न सोडविण्या बाबत सकारात्मक पावले उचलेल,असे ते म्हणाले. भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी आ. संभाजीराव पाटील यांच्या नेतृत्वात सर्वांनी या प्रश्नावर एकत्रित येण्याचे आवाहन करतानाच गरज पडल्यास आंदोलने उभारण्यास तयार असल्याचे सांगितले. देविदास काळे म्हणाले की,आ.संभाजीराव पाटील यांच्या नेतृत्वातच लातूरचा पाणी प्रश्न कायमचा सुटू शकतो.त्यासाठी आपण त्यांना पाठबळ देणे गरजेचे आहे.अफसर शेख यांनी पाणी हा राजकारणाचा नव्हे तर जीवनमरणाचा प्रश्न असल्याचे सांगितले.आ. संभाजी पाटील हे वेगळ्या पक्षातील असले तरी या प्रश्नाकडे राजकारण विरहित दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

शिवानंद हेंगणे यांनी या सभेचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन चंद्रकांत कातळे तर आभार प्रदर्शन जिपचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी केले.या सभेस अभियानात सहभागी झालेल्या शेकडो दुचाकीस्वारांसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

नो हॉंकिंग रॅली... गणेशोत्सवाच्या काळात ८ दिवस जिल्ह्यात ही दुचाकी रॅली काढली गेली. रॅलीत सहभागी झालेल्या दुचाकीस्वारांनी कधीही हॉर्न वाजविला नाही. यामुळे शेकडो दुचाकी असूनही गोंगाट व हॉर्नचा कर्णकर्कश आवाज ऐकू आला नाही.रॅली दरम्यान कोठेही अपघात झाला नाही.दुचाकी चालकांनी शिस्तीत वाहने चालवल्याने हे शक्य झाले.

१२८७ किमीचा प्रवास...

आठ दिवसांमध्ये दुचाकी रॅलीने जिल्ह्यात १२८७ किलोमीटर प्रवास केला. निलंगा,शिरूर अनंतपाळ, देवणी,उदगीर,जळकोट, चाकूर,अहमदपूर,रेणापूर, औसा,लातूर तालुका व लातूर शहरातून दुचाकी स्वारांनी प्रवास केला. यादरम्यान ३५४ गावे,४८२ ग्रामपंचायती व १०२५ गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी आ. निलंगेकर यांनी संवाद साधला.यादरम्यान १५४ संवाद सभा विविध ठिकाणी घेण्यात आल्या.

उत्स्फूर्त पाठिंबा...

आ.निलंगेकर यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या या दुचाकी रॅलीस विविध गावातील गणेश भक्त,युवक मंडळे, महिला मंडळ,बचत गट, यासह शिवसेना,राष्ट्रवादी कॉँग्रेस,अखिल भारतीय छावा संघटना,शेतकरी संघटना,प्रहार संघटना, रिपाई आठवले गट,रासप, रयत क्रांती संघटना, विविध शेतकरी गट,वाहन चालक संघटना, ठिकठिकाणचे व्यापारी, शेतकरी,शेतमजूर यांच्यासह नागरिकांनी पाठिंबा दिला.यादरम्यान जवळपास साडेअकराशे पाठिंबा पत्रे या संस्था व संघटनांनी आ.निलंगेकर यांच्याकडे सुपूर्द केली.

# शनिवारी भूकंपग्रस्त किल्लारीमध्ये भूकंपग्रस्तांचे तारणहार शरद पवारांचा कृतज्ञता सोहळा : सक्षणा सलगर

लातूर : येत्या शनिवारी, दि. ३० सप्टेंबर २०२३ किल्लारीच्या महाप्रलयंकारी भूकंपास ३० वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचे औचित्य साधून तत्कालिन कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री तथा भूकंपग्रस्तांचे तारणहार शरदचंद्र पवार यांच्या कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भूकंपग्रस्त कृती समितीच्या कु. सक्षणा सलगर यांनी बुधवारी सायंकाळी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली.३० सप्टेंबर १९९३ च्या महाप्रलयंकारी भूकंपात लातूर व धाराशिव जिल्ह्यातील अनेक गावे उध्वस्त झाली. हजारो निष्पाप लोकांना आपले प्राण गमवावे लागले. या भूकंपाची वार्ता समजताच राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री शरद पवार अवघ्या दोन तासात भूकंपग्रस्त भागात धावून आले होते. भूकंपग्रस्त भागाच्या नवनिर्मितीसाठी स्वतः शरद पवारांनी पुढाकार घेतल्याच्या आठवणींना यावेळी उजाळा देण्यात आला. शरद पवारांनी त्यावेळी भूकंपग्रस्तांच्या भल्यासाठी जे केले त्याचे



वर्णन करण्यास शब्दही अपूरे पडतात, असे सांगून सक्षणा सलगर यांनी शनिवारी सकाळी दहा वाजता किल्लारीच्या क्रांतीकारी मैदानावर हा कृतज्ञता सोहळा होणार असल्याचे सांगितले.विनायकराव पाटील कवठेकर यांनी यावेळी बोलताना हा कृतज्ञता सोहळा पूर्णतः अराजकीय असल्याचे सांगितले. या सोहळ्यासाठी लातूर - धाराशिव जिल्ह्यातील सर्व आजी - माजी लोकप्रतिनीधींना निमंत्रित करण्यात आले आहे. शरद पवारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याचे निमंत्रण देण्यासाठी गेल्यानंतर त्यांनी अनेक आठवणींना उजाळा देण्याचे काम केल्याचे पाटील यांनी सांगितले. सुभाष पवार, अ‍ॅड. राहुल मातोळकर यासह अनेक मान्यवरांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.या पत्रकार परिषदेस राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस संजय शेटे, लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार, राज राठोड, अमर बिराजदार, नानाराव भोसले, प्रकाश पाटील, डी. उमाकांत यांची उपस्थिती होती.

# स्वामी रामानंदतीर्थ व्याखानमालेच्या वतीने ‘उमगलेले गांधीजी’

लातूरः- मोहनदास करमचंद गांधी पूर्णपणे समजले आहेत, असा दावा कुणीही करू शकत नसलं तरी त्यांचं एकही पुस्तक न वाचता आम्हाला गांधीजी पूर्णपणे कळालेत असा काहींचा तोरा असतो. याच अविर्भावात अशा लोकांकडून गांधीजींवर अश्लाघ्य शब्दांत टीका होत असते. त्यातही ‘लगे रहो मुन्नाभाई’ सारख्या सिनेमातून गांधीजी तत्त्वज्ञान म्हणजे एका गालावर मारलं की दुसरा गाल पुढे करायचा हेच लोकांपर्यंत पोचतं. आणि मजबुरी का नाम महात्मा गांधीजी होऊन जातं! परंतु गांधीजी त्यापलिकडे आणि त्या अलिकडेही खूप काही आहेत हे समजून घेण्यासाठी मुंबई येथील ’ आविष्कार’ ; ह्या ख्यातनाम नाट्यसंस्थेच्यावतीने ‘उमगलेले गांधीजी’ हा अभिवाचनाचा उपक्रम चालू आहे.
१९७१पासून आविष्कारने आजपर्यंत दोनशेपेक्षा अधिक नाटकांची निर्मिती आणि त्यांचे पाच हजारांपेक्षा अधिक प्रयोग सादर केले आहेत. आविष्कारला अरविंद आणि सुलभा देशपांडे, अरुण काकडे, माधव आणि प्रेमा साखरदांडे, विजय तेंडुलकर, पं. सत्यदेव दुबे, गुरू पार्वतीकुमार, रमेश पुरव,जयदेव आणि रोहिणी हट्टंगडी, चंदर होनावर, शांक-नील, प्रदीप मुळ्ये, शफाअत खान, अजित भगत, चेतन दातार, सुषमा देशपांडे, विजय केंकरे, चंद्रकांत कुलकर्णी हे आणि असे प्रतिभावान कलावंत लाभत गेले. त्यांच्या सहभागामुळे ‘शांतता! कोर्ट चालू आहे’, ‘तुघलक’, ‘दुर्गा झाली गौरी’, ‘वाडा चिरेबंदी’ व नाट्यत्रयी अशा अनेक उत्तमोत्तम कलाकृती सादर केल्या.दूरचित्रवाणी माध्यमातील शिलेदार व दिग्दर्शक दीपक राज्याध्यक्ष यांच्या संकल्पनेतून ‘उमगलेले गांधीजी’ आकार घेत गेले. उन्मेष अमृते यांच्या संशोधनातून काही प्रभावी लेख पुढे आले आणि त्याचं संकलन करून कार्यक्रमाची संहिताच तयार केली गेली. गांधीजींनी लिहिलेले, गांधीजींवर लिहिलेले, गांधीजींच्या आठवणी सांगणारे, गांधीजींचा विचार स्पष्ट करून सांगणारा हा कार्यक्रम आहे. त्यात, नरहर कुरूंदकर, पु.ल.देशपांडे, श्रीपाद केळकर, वि. स. वाळिंबे, सुरेश द्वादशीवार व रामचंद्र गुहा अशा लेखकांच्या लेखांचे अभिवाचन केले जाते. यातून गांधीजी कसे घडले, त्यांचे सत्याग्रहाचे आणि अहिंसेचे प्रयोग काय होते, एक राजकीय आणि सामाजिक नेता म्हणून समाजात त्यांचा काय प्रभाव होता

# मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश व मा.जिल्हाधिकारी यांच्या हस्ते मनपा कर्मचारी गणेशाची आरती.

लातूर/प्रतिनिधीः मा.प्रमुख जिल्हा जिल्हा न्यायाधीश श्रीमती सुरेखा कोसमकर व मा.जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते महानगरपालिकेत स्थापन करण्यात आलेल्या श्री गणेशाची आरती करण्यात आली. महानगरपालिकेत मनपा कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने यावर्षी महिला पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली होती. महिला पदाधिकाऱ्यांनी गणेशोत्सव उत्साहात साजरा केला.महिला पुढाकार घेऊन उत्सव साजरा करत असताना मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती सुरेखा कोसमकर व मा.जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी गणेश मंडळास भेट दिली.त्यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली.यावेळी त्यांनी महिला पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.गणेश मंडळाच्या वतीने वृक्ष देऊन त्यांचा सत्कार



करण्यात आला. सोबत उपायुक्त श्रीमती मयुरा शिंदेकर, उपायुक्त श्रीमती विणा पवार, सहाय्यक आयुक्त श्रीमती मंजुषा गुरमे तसेच कर्मचारी गणेश मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती रंदावनी पवार, सचिव श्रीमती अनुराधा देवकते यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिती होती.

# लातूर येथे शौर्य दिनाचे शुक्रवारी आयोजन

लातूर, दि. २७ (जिमाका) : भारतीय सैन्यदलाने २९ सप्टेंबर २०१६ रोजी पाकिस्तानहद्दीत सर्जिकल स्ट्राइकद्वारे अतिरेक्यांचा खात्मा केला. भारतीय सैन्याच्या या अभिमानास्पद कामगिरीच्या स्मरण व्हावे, यासाठी आणि माजी सैनिकांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी २९ सप्टेंबर रोजी शौर्य दिन साजरा करण्यात येतो. त्यानुसार २९ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता नवीन जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात शौर्य दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता व शौर्यपदकधारकांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.लातूर जिल्ह्यातील शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, शौर्यपदकधारक, माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी, शासकीय व विविध अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी तसेच शाळा, कॉलेजमधील विद्यार्थी यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे यांनी केले आहे.

# केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्याशी माजी आ.कव्हेकरांची विविध विषयावर चर्चा

लातूर दि.२७-०९-२०२३ भाजपा नेते तथा केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या दिल्ली येथील कार्यालयात भाजपा किसान मोर्चाचे गोवा प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांची भेट घेऊन मराठवाडा व देशातील विविध विषयावर चर्चा करून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचा गौरव करीत त्यांच्या नेतृत्त्वाखालील चौफेर प्रगतीचा आलेख मांडत २१ व्या शतकामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली भारत पुन्हा एकदा जगाचे नेतृत्त्व करेल, असा विश्वास माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांनी त्यांच्याशी बोलताना व्यक्त केला.राजनाथसिंह हे १९८८ मध्ये विधान परिषदेवर निवडून आले. १९९१ मध्ये उत्तरप्रदेश सरकारमध्ये शिक्षणमंत्री झाले. १९९७ मध्ये उत्तरप्रदेशचे भाजपा प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. २००० मध्ये उत्तरप्रदेश मुख्यमंत्रीपदी विराजमान



व अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रीमंडळामध्ये त्यांनी केंद्रीय भूपृष्ठवाहतूक मंत्री पदीही काम केलेले आहे. तसेच २००३ मध्ये कृषी मंत्री, २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या मंत्री मंडळात केंद्रीय गृहमंत्री व २०१९ पासून ते आजतागायत ते केंद्रीय सरक्षंण मंत्री पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांची दिल्ली येथील कार्यालयात त्यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.

# वीर माहेश्वर अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

लातूर : लातूर येथील वीर माहेश्वर अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटीची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवारी, दि. २७ सप्टेंबर रोजी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात उत्साहात संपन्न झाली. सोसायटीच्या सभागृहात पार पडलेल्या या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे अध्यक्ष कीर्तिकुमार देवणीकर हे होते. मंचावर उपाध्यक्ष विजयकुमार मठपती, सचिव अशोक मठपती, ज्येष्ठ सभासद विश्वनाथ स्वामी सावळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी आद्यगुरू रेणुकाचार्यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. पतसंस्थेचे सचिव अशोक मठपती गुरुजी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताकात संस्थेच्या अल्पावधीत होत असलेल्या प्रगतीची माहिती दिली.



पतसंस्थेच्या या यशात सर्व संचालक मंडळ, सभासद तसेच कर्मचारी वृंदाचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. भविष्यात आपली पतसंस्था यापेक्षाही अधिक गतीने कार्य करून समाजातील गरजूंचे उज्वल भवितव्य घडविण्याकामी प्रयत्नशील राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पतसंस्थेचे अध्यक्ष कीर्तिकुमार देवणीकर यांनी यावेळी बोलताना संस्थेचे सर्व भागधारक, ठेवीदार, खातेदार, संचालक या सर्वांच्या सहकार्यामुळे संस्था प्रगतीपथावर असल्याचे सांगितले. सहकार खात्याने वेळोवेळी घातलेल्या निर्बंधामुळे व नवीन धोरणांमुळे सहकारी संस्थांसमोर नवीन आव्हाने निर्माण होत आहेत. सहकारी संस्थांना इतर क्षेत्रातील खाजगी वित्तीय संस्थेच्या स्पर्धाना तोंड देत काम करावे लागत आहे. तरीही सर्वांच्या सहकार्याने अडचणींवर मात करत आपली संस्था प्रगतीपथावर आहे. याचे श्रेय सर्वांना असल्याचे ते म्हणाले. पतसंस्थेचे व्यवस्थापक अमोल हलगरकर यांनी अहवाल वाचन केले. यावेळी पिडमी एजंट बसवराज मठपती, संजय चक्रे, राजकुमार राजे, बालाजी चव्हाण, लक्ष्मीकांत पेठकर यांसह विश्वनाथ स्वामी सावळे, रामेश्वर हळळीखेडे, प्रा. मल्लेश झुंगा स्वामी, गुरुलिंग स्वामी गणाचार्य, शिवहार स्वामी, शिवकांत स्वामी, महादेव गजभार, इंजि. प्रणिल स्वामी, श्रीधर स्वामी, अनिल स्वामी, नरेंद्र बोरा आदी मान्यवरांचाही संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवरुद्र स्वामी यांनी केले. पतसंस्थेचे व्यवस्थापक अमोल हलगरकर यांचाही सर्व सहकारी कर्मचाऱ्यासमवेत मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
यावेळी संस्थेचे संचालक चंद्रशेखर स्वामी हुंडेकरी, वैजनाथ स्वामी, विजयकुमार चोळखणे, काशिनाथ तोगुरगे , बसवराज स्वामी लिंबाळकर , दगडू तपसे, सौ. श्रीदेवी स्वामी, विजयकुमार चिट्टे , बसवराज चिट्टे यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा २९ व ३० सप्टेंबर रोजी लातूर जिल्हा दौरा

लातूर, दि. २७ (जिमाका) : विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे ह्या शनिवार, २९ व ३० सप्टेंबर, २०२३ रोजी दोन दिवसांच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचे शुक्रवार, २९ सप्टेंबर, २०२३ रोजी रात्री ८. ३० वाजता लातूर येथे आगमन होईल. विधानपरिषद उपसभापती श्रीमती डॉ. गोऱ्हे ह्या शनिवार, ३० सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी ८.३० वाजता लातूर येथून किल्लारीकडे प्रयाण करतील. सकाळी ९.३० वाजता त्यांचे किल्लारी येथे आगमन होईल. किल्लारी येथील भूकंपात मृत झालेल्या नागरिकांच्या स्मरणात बांधण्यात आलेल्या स्मारकास अभिवादन करतील. सकाळी ११.०० वाजता किल्लारी येथे आयोजित कृतज्ञता सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी १२.४५ वाजता किल्लारी येथून लातूर शासकीय विश्रामगृहकडे प्रयाण करतील. उपसभापती श्रीमती डॉ. गोऱ्हे यांचे दुपारी १.१५ वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. दुपारी २.३० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेतील. दुपारी ३.३० वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे लातूर व धाराशिव जिल्हाधिकारी यांच्या समवेत भूंकपाला ३० वर्षे आणि सद्यस्थिती याबाबत बैठक घेतील. दुपारी ४.४५ वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे सामाजिक संस्था यांच्या समवेत बैठक घेतील. सायंकाळी ५.४५ वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे शिवसेना पदाधिकारी यांच्या समवेत बैठकीला उपस्थित राहतील.

# आर्थिक शिस्तीचे पालन करून रेणा कारखाना शेतक-यांच्या विश्वासास पात्र. माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांचे प्रतिपादन

लातूरः-- साखर कारखानदारीत अल्पावधीतच रेणा साखर कारखान्याने राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. नियोजनबद्ध व्यवस्थापन व आर्थिक शिस्त पाळल्यामुळेच रेणा कारखाना शेतकरी सभासदांच्या विश्वासास पात्र राहिला.असे प्रतिपादन रेणाचे संस्थापक तथा राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांनी केले. रेणा सहकारी साखर कारखान्याच्या २१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासरावजी देशमुख, माजी आमदार त्र्यंबक भिसे, राज्य साखर संघाचे संचालक आबासाहेब पाटील, जिल्हा बँकेचे माजी चेअरमन श्रीपतराव काकडे, रेणाचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडिले, संत शिरोमणी चेअरमन गणपतराव बाजुळगे, व्हा.चेअरमन श्याम भोसले, जिल्हा बँकेचे व्हा.चेअरमन प्रमोद जाधव, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, २१ शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, विलास कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे, रेणाचे व्हा.चेअरमन अनंतराव देशमुख, रेणापुर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, सपनाताई किसवे, इंदुताई ईगे,स्वयंप्रभा पाटील,रेणाचे संचालक धनराज देशमुख,संग्राम माटेकर, प्रेमनाथ आकणगिरे, चंद्रकांत सूर्यवंशी, प्रवीण पाटील, संभाजी रेड्डी, शहाजी हाके, तानाजी कांबळे, संजय हरिदास,वैशालीताई माने, अमृताताई देशमुख, लालासाहेब चव्हाण,अनिल कुटवाड ,सतीश पाटील, कार्यकारी संचालक बी. व्ही.मोरे,मांजराचे कार्यकारी संचालक पंडित देसाई, विलास कारखान्याचे कार्यकारी संचालक संजीव देसाई,विलास सह. साखर कारखाना युनीट २ चे कार्यकारी संचालक श्री पवार संत शिरोमणीचे प्र.कार्यकारी संचालक रविशंकर बरमदे, जागृतीचे कार्यकारी संचालक गणेश येवले आदींची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख म्हणाले की, लोकनेते विलासराव देशमुख यांनी विकासाचा जो मंत्र अंगीकारला तो डोळ्यासमोर ठेवून रेणा व मांजरा परिवारातील सर्व कारखाने वाटचाल करत आहेत. रेणा कारखान्याने काळानुसार वेगवेगळे प्रयोग करत नवीन तंत्रज्ञान आत्मसात



केले, लवकरच सोलार प्रकल्प सीएनजी गॅस प्रकल्प उभारणी रेणा कारखाना करणार असल्याचे सांगून, रेणा कारखाना कर्मचाऱ्यांना दिपावली निमित्ताने दहा(१०%) टक्के बोनस व सभासदांना दीपावली निमित्त प्रति सभासद ५० किलो साखर सवलतीच्या दरात देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.यावेळी आपल्या मनोगतात लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, मांजरा परिवारातील कारखान्याच्या सर्वसाधारण सभा एक प्रकारचा आनंद उत्सव असतो सभासदांचा विश्वास व नेतृत्वाचे विचार याचे आदान प्रदान या सभांमधून होत असते. हे वेगळेपण महाराष्ट्रातील साखर कारखानदारीत क्वचितच पाहायला मिळते. येथील नेतृत्वाने नेहमीच बेरजेचे राजकारण करून सर्वांना सोबत घेऊन चालण्याची भूमिका अंगीकारली,म्हणूनच मोठ्या दिमाखात लातूरच्या सहकार क्षेत्रातील कामाचे कौतुक राज्य व देशभरात होत असते. येथील नेतृत्वाने सत्तेचा वापर जनतेच्या सेवेसाठी केला असल्याचे सांगून रेणाच्या यशस्वी वाटचालीचा गौरव त्यांनी केला. यावेळी आपल्या प्रास्ताविक पर मनोगत चेअरमन सर्जेराव मोरे यांनी मागील गळीत हंगामातील कारखान्याचा आढावा सर्वांसमोर सादर करून सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आ.अमितजी देशमुख व आ. धिरजजी देशमुख यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली भविष्यात देखील शेतकऱ्यांची सेवा करण्यासाठी रेणा कारखाना कटिबद्ध आहे असे त्यांनी सांगितले .यावेळी कार्यकारी संचालक बी.व्ही.मोरे यांनी विषय पत्रिकेवरील सर्व विषयांचे वाचन केले. त्यास व्हा. चेअरमन अनंतराव देशमुख यांनी सर्व सभासद व संचालकाच्या वतीने अनुमोदन दिले व उपस्थित सर्व सभासदांनी टाळ्यांच्या गजरात सर्व विषयांना मंजुरी दिली. सर्वसाधारण सभेत सर्वाधिक ऊस उत्पादक, सर्वाधिक ऊस तोडणी ठेकेदार, सर्वाधिक ऊस वाहतूकदार यांचा यथोचित सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शेतकरी सभासद, विविध संस्थांचे पदाधिकारी, खाते प्रमुख, अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सचिन सूर्यवंशी यांनी केले तर आभार संचालक प्रवीण पाटील यांनी व्यक्त केले

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE